कंत्राटी ग्रामसेवक म्हणून तीन वर्षांचा व्यतीत केलेला सेवा कालावधी १२ वर्षांच्या सेवेनंतर देण्यात येणाऱ्या कालबध्द पदोन्नती तसेच आश्वासित प्रगती योजनेतील वरिष्ठ वेतनश्रेणी देण्याकरिता ग्राह्य धरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक- कंत्राटी- २०१६/प्र.क्र -१३२/आस्था-७,
बांधकाम भवन, २५- मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई-४०० ००१,
दिनांक - २८ मार्च,२०१८ .

वाचा:- १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.नियुक्ती /१०९६ /प्र.क्र ३५५७ /१४,दि.३१ मे, २०००

२) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. एपिटी /१००० /प्र.क्र २७२ /१३, दि.६ जून, २००१

३)शासन निर्णय,ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.एपिटी /१०००/प्र.क्र २७२/आस्था-८, दि.२५ जून, २००३

४) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.एपिटी /२००५ /प्र.क्र २२९/आस्था-८, दि. २० एप्रिल, २००६.

प्रस्तावना :-

राज्यातील ग्रामसेवकांची नियुक्ती महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश ) नियम, १९६७ च्या परिशिष्ट आठ ( तीन ) नुसार सरळ सेवेने केली जाते. दिनांक १९.१२.२००५ रोजी मंत्रीमंडळाच्या झालेल्या बैठकीत राज्यातील ग्रामसेवक, या पदावरील कर्मचाऱ्यांची पहिले तीन वर्षे कंत्राटी पध्दतीने ठोक मानधनावर नियुक्ती करण्याचा दिनांक ३१ मे, २००० च्या शासन निर्णयांन्वये घेण्यात आला. या विभागाने दि २० एप्रिल, २००६ रोजीच्या शासन निर्णयांन्वये सेवानिवृत्ती व सेवानिवृत्ती विषयक इतर लाभासाठी ग्रामसेवकाची कंत्राटी सेवा ग्राहय धरण्यास वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेऊन निर्णय निर्गमित केला तसेच त्यानुसार अटी व शर्ती दिनांक ६ जून, २००१ च्या शासन निर्णयांन्वये निश्चित केले आहेत. आजतागायत जिल्हा परिषद सेवेत नव्याने येणाऱ्या ग्रामसेवकांना पहिली तीन वर्ष कंत्राटी पध्दतीने ठोक मानधनावर सेवा बजवावी लागते. हा तीन वर्षाचा कालावधी निवृत्ती वेतनासाठी व सेवा निवृत्ती विषयक इतर लाभासाठी ग्राह्य धरण्यात येते. मात्र हा कालावधी कालबध्द पदोन्नतीसाठी तसेच आश्वासित प्रगती योजनेसाठी ग्राहय धरण्यात येत नव्हता.

सदरचा कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून विचारात घेऊन तो कालबध्द पदोन्नतीसाठी तसेच आश्वासित प्रगती योजनेतंर्गत १२ वर्षांची सेवा झाल्यानंतर ग्राहय धरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

शासन निर्णय दि. ६ जून २००१ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या धोरणानुसार राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये कंत्राटी ग्रामसेवक म्हणून नियुक्त झालेल्या व ज्यांच्या सेवा नियमित झालेल्या आहेत अशा ग्रामसेवकांना कालबध्द पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेतंर्गत १२ वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देतांना त्यांची तीन वर्षाची कंत्राटी सेवा विचारात घेऊन सदरचा लाभ देण्यात यावा. यावर होणारा खर्च संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्यातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१६१९३९२९२० हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sharad Shantaram Yadav

Digitally signed by Sharad Shantaram Yadav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7b2ace04cd5b33035f08de84acacbc24916dc2bb31884c10f28f127b001c2fea, cn=Sharad Shantaram Yadav
Date: 2018.03.28 17:02:10 +05'30'

(शरद यादव)
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन

प्रति,

महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र -१ व २
महालेखापाल (लेखापरीक्षा ) महाराष्ट्र -१ व २
संचालक लेखा व कोषगारे
विभागीय आयुक्त,(सर्व )
मुख्य कार्यकारी अधिकारी,( सर्व जिल्हा परिषदा)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व जिल्हा परिषदा )
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य/पंचायत), (सर्व जिल्हा परिषदा )
सामान्य प्रशासन विभाग कार्यासन -१२ व १३ ,वित्त विभाग व्यय -१५,सेवा-३ .
निवडनस्ती आस्था-७